मालेगाव पंचायत समिती जि. नाशिक प्रशासकीय इमारतीच्या संरक्षक भिंत, परिसर सुधारणा व इतर उपकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१७/प्र.क्र. ९३/बांधकाम-४
मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: २३ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय क्र.पंसई-२०१३/प्र.क्र.२१६/पंरा-७, दि.०४.०३.२०१३
२) शासन निर्णय क्र.पंसई-२०१३/प्र.क्र.२३५/पंरा-७, दि.३१.०३.२०१७
३) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्र. जिपना/ बांखा/ इवद-२/पीबी/२२७/२०१७ दि.२४.०७.२०१७

प्रस्तावना :-

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी वरील संदर्भीय पत्रान्वये मालेगाव पंचायत समिती जि. नाशिक प्रशासकीय इमारतीच्या संरक्षक भिंत, परिसर सुधारणा व इतर उपकामास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. मालेगाव पंचायत समिती जि. नाशिक प्रशासकीय इमारत बांधकामास दिनांक ०४.०३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये रु. ३४५.७० लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच, सदरहु इमारत बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता किंमती इतका पुर्ण निधी जिल्हा परिषदेला टप्प्या-टप्प्याने वितरीत करण्यात आला आहे. तसेच, मालेगाव पंचायत समिती जि. नाशिक प्रशासकीय इमारतीच्या ठिकाणी अंतर्गत फर्निचर सुविधेच्या कामास दिनांक ३१.०३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये रु. ९६.७४ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत मालेगाव पंचायत समितीच्या मुळ प्रशासकीय इमारतीचे बांधकाम जवळपास पुर्ण झाले असून, सदर मुळ प्रशासकीय इमारत बांधकामावरील एकूण रु. ३२४.१४ लक्ष खर्च वजा जाता रु. २१.५६ लक्ष इतका निधी शिल्लक आहे. त्यामधून, मालेगाव पंचायत समितीच्या सुरक्षेच्या दृष्टीने व इमारतीच्या सुलभ वापरासाठी इमारतीस संरक्षक भिंत, परिसर सुधारणा व इतर आवश्यक उपकामे करण्यासाठी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता (बांध) जिल्हा परिषद नाशिक यांनी रु. २२.०१ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर अंदाजपत्रक सन २०१५-१६ च्या दरसूचीवर आधारीत असून कार्यकारी अभियंता (बांध.) जिल्हा परिषद नाशिक यांनी साक्षांकीत केले आहे.

३. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या तांत्रिक छाननी अंती, मालेगाव पंचायत समिती प्रशासकीय इमारतीच्या संरक्षक भिंत, परिसर सुधारणा व इतर उपकामास प्रशासकीय मान्यता देण्याच्या रुपये २२.०१ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

४. मालेगाव पंचायत समिती प्रशासकीय इमारतीच्या संरक्षक भिंत, परिसर सुधारणा व इतर उपकामाच्या एकूण रक्कम रुपये २२,०१,०००/-(अक्षरी रु. बावीस लक्ष एक हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामास पुढील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) प्रस्तुत प्रशासकीय इमारतीच्या उपकामाच्या बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणून, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुविजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात काटकसर आणि जास्तीत जास्त पर्यावरण पुरक बांधकाम साहित्य व साधन सामुग्रीचा वापर करण आवश्यक राहील.

२) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जि.प. यांनी दक्षता घ्यावी.

३) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त एका वर्षात पूर्ण होईल, असे संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जि.प. यांनी नियोजन करावे.

४) प्रस्तुत कामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.) जि.प. यांनी दक्षता घ्यावी.

५) या कामासाठी मुळ प्रशासकीय इमारत बांधकामावरील शिल्लक असलेला एकूण रु. २१.५६ लक्ष इतका निधी व जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून रु. ४५,०००/-इतका निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा.

५. मालेगाव पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या संरक्षक भिंत, परिसर सुधारणा व इतर उपकामाच्या अंदाजपत्रकाचा अंतिम गोषवारा पुढील प्रमाणे आहे:-

FINAL GENERAL ABSTRACT FOR MALEGAO P.S. BLDG SUB WORKS		
Sr. No	Description of item	Amount (in Rs.)
1	Constructing Compound wall & Dismantling Staff Quarter	1010699.00
2	Improvement of Panchayat Samiti Primicess	1190000.00
	Total	2200699.00
	SaysRs.	2201000.00

६. प्रस्तुत काम मुळ प्रशासकीय इमारत बांधकामावरील शिल्लक असलेल्या रु. २१.५६ लक्ष व जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमधून रु. ४५,०००/-इतक्या निधीतून हाती घेण्यात येणार असल्यामुळे या कामी जिल्हा परिषदेस वेगळा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही. यावरील खर्च " २५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची

टाकण्यात यावा. सदर सहाय्यक अनुदानाच्या विनियोजना संबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्रे, महालेखापाल, संबंधीत विभागीय आयुक्त यांना पाठवून, त्याची प्रत या विभागाकडे पाठविण्यात यावी.

७. सदरहु बांधकामाबाबतची माहिती इमारत बांधकामाकरीता विकसीत करण्यात आलेल्या कंस्ट्रक्शन ट्रॅकर या प्रणालीवर भरण्यात यावी.

८. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पांच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७११२३१३५०२२६६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2017.11.23 14:19:25 +05'30'

(दि.बा पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक
२) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
३) मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो.,कॅम्प ऑफिस, मध्यवर्ती इमारत, पुणे
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
५) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
७) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद नाशिक
८) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा नाशिक
९) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१०) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा नाशिक विभाग, नाशिक
११) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक
१२) सभापती, पंचायत समिती, मालेगाव, जिल्हा नाशिक
१३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव, जिल्हा नाशिक
१४) निवडनस्ती-बांधकाम-४